


# शालेय शिक्षण विभाग

## महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्प : २०१६-१७



समर्थन




## समर्थन

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

कार्यालयीन पत्ता: समर्थन, ११५, धुरी कॉमर्स प्लाझा,
वसई रोड रेल्वे स्थानकासमोर, वसई (पू),
पालघर -४०१ २०८ ☎ ०२५०-२३९०१०३/४

Email: samarthanmumbai97@gmail.com,
Website: www.samarthanadocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन :

**मुक्ता भारती**

संकलन:

**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

मांडणी व अक्षरजुळणी :

**प्रतिक्षा कोयंडे**

**सोनल सहस्त्रबुद्धे**

**नोंदणी क्रमांक:**

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**

समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

**'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर**

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २००८-०९ पासून २०१६-१७ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.

- विवेक पंडित
संस्थापक, समर्थन
९८२३१४७००३
pvivek2308@gmail.com

# शाळाबाह्य मुलांचा प्रश्न शासनाला मान्य करायचा नाही का?

- शाळाबाह्य मुलांचे ४ जुलैचे पहिले सर्वेक्षण फसल्यावर १५ ते ३१ जानेवारी दरम्यान दुसरे सर्वेक्षण करण्यात आले. पहिल्या सर्वेक्षणात ५५ हजार तर दुसऱ्या सर्वेक्षणात केवळ १० हजार मुले शासन शोधू शकले आहे. व या सर्वेक्षणाच्या अपयशाचे कारण स्वयंसेवी संस्थांना धरून शासन आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करीत आहे.
- शासन ४ जुलै २०१५च्या सर्वेक्षणानंतर असे म्हणत होते की, शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण वर्षभर चालू राहणार १५ ते २१ जानेवारीच्या दुसऱ्या सर्वेक्षणानंतरही शासन तेच सांगत आहे. प्रश्न हा आहे की केवळ सर्वेक्षण आणखी किती वर्षे चालणार आहे? महाराष्ट्राची खरी शाळाबाह्य संख्या कळायला किती काळ वाट बघायला लागणार आहे. हे शासनाने जाहीर करावे. फेर सर्वेक्षण फसल्यामुळे या मुलांचे हे संपूर्ण वर्ष वाया गेले आहे. याची जबाबदारी कोण घेणार?
- शिक्षण हक्क कायदा लागू होऊन सहा वर्ष झाली तरी अजून शाळाबाह्य मुले किती आहेत हे जर नक्की होत नसेल तर ही मुले शाळेत येणार कधी, शिकणार कधी? याचे उत्तर मिळायला हवे. शिक्षण मंत्री दोन्ही सर्वेक्षणाबाबत बोलताना ही पूर्ण सर्वेक्षण नाहीत असे सांगून शासकीय यंत्रणेचा बचाव करतात परंतु शिक्षण यंत्रणेने ही दोन्ही सर्वेक्षण परिपूर्ण झालेली आहेत असेच कागदावर दाखविले आहे. अशा प्रकारे क्रूरपणे राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर हे शासन कोणती कारवाई करणार आहे. शिक्षण हक्काचा कायदा आजच्या शालेय शिक्षण मंत्र्यांनी समजून घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाचा हक्क सामाजिक बाब नसून प्रत्येक बालकाला तो हक्क आहे. तो त्याला जन्मत:च मिळाला आहे. आणि तो देणे हे शासनाचे घटनात्मक कर्तव्य आहे. शाळाबाह्य मुलं किती हा काय विचार करण्याचा विषय आहे काय? एक बालक जरी शाळेच्या बाहेर असेल तर त्याला शिक्षण देण्याचे कार्य शासनाचे आहे.
- वारंवार शाळाबाह्य मुलांचे सर्व्हेक्षण करीत बसलो आहोत. या बालकांना शिक्षणाची योजना कोणती ते सांगा? शाळा बाह्य मुलं दाखवा आणि हजार रुपये मिळवा अशा योजना आखता. मंत्री महोदय, प्राथमिक शिक्षण परिषदच कबूल करते. ७४ हजार ९७१ मुलं आजही शाळेच्या बाहेर आहेत. शहामृगासारखे वादळ आल्यावर तोंड का लपवता? मंत्री महोदय, ही मुलं शाळेत येत नाहीत म्हणून त्यांच्यापर्यंत शाळा नेण्याची योजना तयार करा. आधीच उशीर झाला आहे. या मुलांचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेण्याचा अधिकार आपणास दिलेला नाही. खुद्द मुंबईत ७ हजाराहून अधिक मुलं शाळाबाह्य असल्याची आपलीच आकडेवारी सांगते.

# शालेय शिक्षणाची ठळक वैशिष्ट्ये

## स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१५-१६

☞ जनगणना २०११ नुसार साक्षरतेत राष्ट्रीय स्तरावर राज्याचा केरळ (९४%), मिझोराम (९१.३३%), गोवा (८८.७०%), त्रिपुरा (८७.२२%), दिल्ली (८६.२१%) व हिमाचल प्रदेश (८२.८०%) नंतर महाराष्ट्राचा (८२.३४%) ७वा क्रमांक आहे.

☞ साक्षरता दर ८२.३% आहे जो राष्ट्रीय स्तरावरील साक्षरतेच्या सरासरीपेक्षा (७३%) बराच जास्त आहे.

☞ राज्यात १ लाख ५ हजार ४८९ प्राथमिक शाळा (इयत्ता १ली ते ८वी) आहेत.

☞ प्राथमिक शाळांमधील पटावरील विद्यार्थ्यांची संख्या १ कोटी ६० लाख १७ हजार आहे. त्यापैकी मुलींची संख्या ७५ लाख ९ हजार (४६.८८%) आहे

☞ प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांची संख्या ५ लाख १५ हजार आहे. मागील वर्षाच्या तुलनेत शिक्षकांच्या संख्येत ९ हजाराने वाढ झाली आहे. मात्र विद्यार्थी संख्येत १ लाख ५५ हजारांनी घट झाली आहे. विद्यार्थी शिक्षक प्रमाणात ३१.१ असून मागील वर्षी हे प्रमाण ३१.९ होते.

☞ राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्त्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार अखिल भारतीय स्तरावरील ७३ टक्के साक्षरता दराच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर ८२.३ टक्के आहे.

☞ मूलभूत शिक्षणाबाबत ५ हजार ३०७ वर्गखोल्या बांधून झाल्या आहेत. परंतु वर्ष २०१४-१५ मध्ये एकाही संगणक कक्षांची स्थापना करण्यात आलेली नाही.

☞ आज राज्यातील ५९ हजार ६३९ शाळांमध्ये संगणकांची सोय नाही. १० हजार ५७० शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड (Ramp) नाहीत.

☞ ८ हजार ९१ शाळांमध्ये विजेची जोडणी झालेली नाही.

☞ २२ हजार ५७६ शाळांमध्ये 'कुंपण भिंत / संरक्षक भिंत' नाहीत.

☞ ५२२ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही.

☞ वर्ष २०१५ मध्ये 'प्रथम' संस्थेतर्फे राज्यातील ३३ जिल्ह्यातील ९८४ गावांमध्ये मुलांची शैक्षणिक स्थिती तपासण्यात आली तेव्हा असे आढळून आले की, ३६ हजार ८३३ मुलांपैकी इयत्ता पहिली स्तराची वाचन क्षमता असलेल्या तिसऱ्या इयत्तेतील मुलांची टक्केवारी ६३.३% होती.

☞ माध्यमिक व उच्च माध्यमिक म्हणजे इयत्ता ९वी ते १०वी इयत्तेच्या २५ हजार १३ शाळांची नोंद झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ५१६ शाळांमध्ये वाढ झाली आहे.

☞ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये ६४ लाख १४ हजार विद्यार्थी पटनोंदणी झाली असून त्यापैकी २९ लाख २० हजार (४५.५२%) मुली आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत २ लाख ३३ हजार विद्यार्थी संख्येमध्ये वाढ झाली आहे.

☞ विद्यार्थी शिक्षकांचे प्रमाण २९.१ असून मागील वर्षी तो २८.२ इतका होता.

☞ सर्व शिक्षा अभियानावर २०१४-१५ मध्ये रु. १ हजार ६७ कोटी ६१ लाख खर्च झाला असून २०१५-१६ मध्ये जानेवारी, पर्यंत रु. ७३१ कोटी ३१ लाख खर्च झाला आहे.

☞ वर्ष २०१२-१३ मध्ये १० हजार ५, वर्गखोल्या बांधल्या गेल्या होत्या वर्ष २०१३-१४ मध्ये त्यात ३ हजार १८८ ने घट होऊन ६ हजार ८१७ वर्गखोल्या बांधल्या गेल्यात तर २०१४-१५ मध्ये केवळ ५ हजार ३०७ वर्गखोल्या बांधल्या गेल्या.

☞ वर्ष २०१२-१३ मध्ये ७४३ शाळांमध्ये संगणक कक्ष स्थापन केले गेले होते. तर २०१३-१४ मध्ये १२९ शाळांमध्ये संगणक कक्ष स्थापन केले गेले होते. मात्र २०१४-१५ मध्ये एकही संगणक कक्ष स्थापन केला गेलेला नाही.

☞ वर्ष २०१२-१३ मध्ये राज्यातील प्रशिक्षित शिक्षकांची संख्या ३ लाख ७० हजार होती त्यात २०१४-१५ मध्ये १ लाख ३० हजारांनी घट झाली आहे.

☞ खाजगी शाळांची संख्या एकूण शाळांच्या तुलनेत वाढत असून आज राज्यात खाजगी शाळांची संख्या ३८ हजार ७१४ (३०%) झाली आहे.

☞ वर्ष २०१३-१४ मध्ये इयत्ता १ली ते ४थी च्या १८ लाख ३९ हजार गरीब विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविले गेले होते त्यासाठी १३ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. त्या तुलनेत वर्ष २०१४-१५ मध्ये ३१ लाख विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली असून त्यांच्यावर होणाऱ्या खर्चात १ कोटी ५० लाख रुपयांनी वाढ झाली आहे.

☞ वर्ष २०१३-१४ मध्ये १ली ते १०वी च्या शासन अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलतीचा लाभ २५ लाख ३६ हजार विद्यार्थ्यांना मिळाला होता व त्यासाठी ३ कोटी ७० लाख रुपये खर्च करण्यात आला होता. वर्ष २०१४-१५ मध्ये ५ लाख १८ हजार विद्यार्थी लाभार्थी वाढले असून ही संख्या ३० लाख ५४ हजारांवर गेली आहे. तर खर्च ७० लाख रुपयांनी वाढून तो ४ कोटी ४० लाखांवर गेला आहे.

☞ आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील इयत्ता ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची योजना आहे. वर्ष २०१३-१४ मध्ये २ लाख विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ झाला होता. व त्या विद्यार्थ्यांवर १ कोटी ४० लाख रुपये खर्च करण्यात आले होते. वर्ष २०१४-१५ मध्ये १२ हजार विद्यार्थ्यांची घट झाली असून खर्च मात्र मागील वर्षा एवढाच म्हणजे १ कोटी ४० लाख रुपये झाला आहे.

☞ वर्ष २०१३-१४ मध्ये आवर्षण प्रवण क्षेत्रातील १०वी व १२वी तील २ लाख ४ हजार विद्यार्थ्यांना परिक्षाशुल्क माफी देण्यासाठी ९ कोटी १० लाख रुपये खर्च करण्यात आला होता. वर्ष २०१४-१५ मध्ये या लाभार्थि विद्यार्थ्यांची संक्या ५ लाख ६३ हजार झाली तर त्यांच्यावरील खर्च १७ कोटी ८० लाख झाला होता.

☞ ४ हजार आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यासाठी वर्ष २०१३-१४ मध्ये २० लाख रुपये खर्च करण्यात आले होते. वर्ष २०१४-१५ मध्ये लाभार्थ्यांच्या संख्येत १ हजाराने घट झाली व ३ हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यात आले व केवळ १ लाख रुपये त्यांच्या विद्यावेतनासाठी खर्च करण्यात आले होते.

☞ प्राथमिक शिक्षणामध्ये निव्वळ पटसंख्येचे प्रमाण ८६.४% असून १३.६०% मुलांची पटनोंदणी साध्य झालेली नाही. याचा अर्थ १००तील सुमारे १४ मुलांनी शाळेचे दर्शनच घेतलेले नाही.

## प्राथमिक उच्च प्राथमिक शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी :

☞ वर्ष २०१४-१५ मध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांची (इयत्ता १ली ते ८वी) संख्या ९७ हजार ८४ इतकी होती. त्यामध्ये ३६ जिल्ह्यांचा समावेश असून ४३ हजार ६६२ गावांचा समावेश आहे.

☞ ७८ हजार ३४६ शाळा या वर्ष २००१ पूर्वीच्या आहेत तर १८ हजार ७३७ शाळा या वर्ष २००१ नंतर निर्माण झालेल्या आहेत.

☞ वर्ष २०११च्या जनगणनेनुसार राज्याची एकूण लोकसंख्या ११कोटी २३ लाख ७३ हजार असून त्यापैकी ७ कोटी १२ लाख ४४ हजार (६३.४७) लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते.

☞ राज्यामध्ये १००० पुरुषांमागे ९२५ महिला आहेत. याचाच अर्थ पुरुषांच्या तुलनेत ४१,११,७७९ महिला कमी आहेत.

☞ राज्याचे एकूण साक्षरता प्रमाण ८२.९टक्के असून पुरुष साक्षरता प्रमाण ८९.८टक्के तर स्त्री साक्षरता प्रमाण ७५.५ टक्के आहे.

☞ वर्ष २०१४०१५ मध्ये वर्ष २०१३-१४च्या तुलनेत ९०५ शाळांमध्ये वाढ झाली आहे.

☞ ९७ हजार ८४ शाळांपैकी ६३ हजार ३८२ शाळा या शासनाच्या आहेत तर २९ हजार १२६ शाळा या खाजगी स्वरुपाच्या आहेत. तर मदरसा व अमान्यता प्राप्त अशा ५७६ शाळा आहेत.

☞ ७७ हजार १७१ शाळा या ग्रामीण भागात असून त्यापैकी १५ हजार ३५० शाळा या खाजगी स्वरुपाच्या आहेत.

☞ ९७ हजार ८४ शाळांमधून १कोटी ६१ लाख ७२ हजार ४३४ विद्यार्थी शिक्षण येत आहेत.

☞ ६८ हजार ४५६ विद्यार्थी हे मदरसा व अमान्यताप्राप्त शाळांमधून शिक्षण घेत आहेत.

☞ ९७ हजार ८४ शाळांमधून १ कोटी ६१ लाख ७२ हजार ४३४ विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी असणाऱ्या शिक्षकांची संख्या ६ लाख ४७ हजार ६२५ इतकी आहे. त्यापैकी ४२ हजार १४२ (६.५०टक्के) शिक्षक हे कंत्राटी तत्त्वावर शिकवत आहेत.

☞ ५७६ मदरसा व अमान्यताप्राप्त शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या ३ हजार १८८ इतकी आहे.

## राज्यातील प्राथमिक शिक्षणाचे वास्तव:

☞ सर्वांना शिक्षण हक्क कायदा, २००९ अंमलात आला त्याला ५ वर्षे उलटून गेली तरी राज्यात सुरू असलेल्या ९७ हजार ८४ प्राथमिक शाळांपैकी ३ हजार ९ शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ राज्यातील ३ हजार ९ शाळा या प्रत्येकी एक वर्ग खोलीत भरतात.

☞ राज्यातील २ हजार ६२१शाळा रस्त्यांना जोडल्या गेलल्या नाहीत.

☞ आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्काराची अपेक्षा शासन करते मात्र आजही १२ हजार १३५ शाळांमध्ये मुलांना खेळण्यासाठी खेळाचे मैदान उपलब्ध नाही.

☞ १७ हजार ३७८ शाळांना कुंपण भिंत बांधलेली नाही.

☞ महिला सबलीकरण, महिला सुरक्षिततेची भाषणं करणाऱ्या शासनाच्या राज्यात ९७० शाळांमध्ये मुलींना स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नाही.

☞ ४९५ शाळांमध्ये मुलांना स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नाही.

☞ ३८८ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय केलेली नाही.

☞ २ हजार ३३० शाळांमध्ये मध्यान्ह भोजन दिले जात नाही.

☞ १५ हजार १४५ शाळांमध्ये स्वयंपाक करण्यासाठी (Kitchen shed) वेगळी खोली बांधलेली नाही.

☞ मेक इन महाराष्ट्राची प्रचार आणि प्रसार करणाऱ्या राज्यात आजही १३ हजार १०६ शाळांमध्ये वीज जोडणी झालेली नाही. या शाळा पूर्णपणे अंधारात आहेत.

☞ इ-गव्हर्नन्स, डिजिटल महाराष्ट्राचा उद्घोष करणाऱ्या शासनाच्या राज्यात ४४ हजार ३६७ शाळांमधून आजही संगणक उपलब्ध नाहीत.

☞ दुर्बल अपंग यांचे पालकत्त्व संविधानाने शासनाकडे दिलेले आहे, मात्र आजही ७ हजार ८६३ शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड बांधलेली नाही.

☞ २ हजार ९१२ शाळांमध्ये शिक्षण हक्क कायदा, २००९ नुसार शाळा व्यवस्थापन समिती स्थापन झालेली नाही.

☞ राज्यातील विविध शाळांमध्ये ५ लाख २ हजार ६५६ वर्गखोल्या आहेत, त्यापैकी २५ हजार ५८५ वर्गखोल्या धोकादायक स्थितीत आहेत.

☞ ६ लाख १४ हजार ५३१ शिक्षकांपैकी २ हजार ४२५ शिक्षकांचे शिक्षण इयत्ता १०वी पर्यंतही झालेले नाही. ९८ हजार ३९१ शिक्षकांचे शिक्षण हे इयत्ता १०वी पर्यंत झाले आहे. १ लाख ४० हजार ७०८ शिक्षक हे उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले होते. २ लाख ९३ हजार ५३९ शिक्षक हे पदवीधर होते.. तर १ लाख १९ हजार ३१८ शिक्षक पदव्युत्तर होते. तर २० हजार ७८ शिक्षक हे एम. फिल./ पी. एच. डी. झालेले १६६ शिक्षक हे पोस्ट डॉक्टरेट केलेले होते.

☞ पोस्ट डॉक्टरेट झालेले १३ शिक्षक तर एम. फिल / पी. एच. डी. झालेले १५० शिक्षक इयत्ता १ ली ते ५ वीच्या वर्गात शिकवत होते.

*-स्रोत: www.udise.in (2014-15)*

**मागील ७ वर्षात राज्य अर्थसंकल्पाच्या योजनांतर्गत खर्चाच्या तुलनेत सर्वसाधारण शिक्षणावर सरासरी योजनांतर्गत खर्च केवळ ३.४४ टक्के झालेला आहे. वर्ष २०१५-१६च्या सुधारित अंदाजानुसार ५.९७ टक्के इतकी वाढ दाखविली आहे. मात्र २०१६-१७च्या अर्थसंकल्पीय अंदाजात त्यात पुन्हा घट होऊन हा योजनांतर्गत खर्च ३.२५टक्क्यांवर आला आहे. ही घट रुपयात मोजली तर योजनांतर्गत खर्चात १८५६ कोटी अंदाजित आहे.**

# इयत्ता १ली ते ८वी दरम्यान ९२ हजार ५७६ मुलांनी

# वेगवेगळ्या कारणांमुळे शाळा सोडल्या

## प्राथमिक शिक्षणात होणारी गळती

तक्ता क्र.१

| इयत्ता | विद्यार्थी संख्या | गळती संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २०५७६३५ | १७९०१ | ०.८७ |
| २ | २०१६२५९ | ८४६८ | ०.४२ |
| ३ | २००४९७१ | ७०१७ | ०.३५ |
| ४ | २००८८८८ | १६२७१ | ०.८१ |
| ५ | २०३७९६३ | ५५०२ | ०.२७ |
| ६ | २०६४७४२ | २६८४ | ०.१३ |
| ७ | २०२५१६५ | ५२२४९ | २.५८ |
| ८ | १९५६८११ | — | — |
| **१-५** | **१०१२५७१६** | **५५६९१** | **०.५५** |
| **६-८** | **६०४६७१८** | **३६८८४** | **०.६१** |
| **एकूण** | **१६१७२४३४** | **९२५७६** | **०.५७** |

- **वर्ष २०१४-१५ मध्ये इयत्ता १ली ते ८वी दरम्यान वेगवेगळ्या कारणांमुळे ९२ हजार ५७६ मुलांनी शाळा सोडल्या म्हणजेच ही मुलं शाळाबाह्य झाली.**
- **इयत्ता १ली मधून वर्ष २०१४-१५ मध्ये २० लाख ५७हजार ६३५ मुलांपैकी १७ हजार ९०१ (०.८७%) मुलांची गळती झाली.**
- **वर्ष २०१४-१५ मध्ये २० लाख ८ हजार ८८८ विद्यार्थ्यांपैकी १६ हजार २७१ (०.८१%)विद्यार्थ्यांची गळती झाली. सातवीपर्यंत सरासरी १००तील ३ मुले गळतात.**
- **वर्ष २०१४-१५ मध्ये २० लाख २५ हजार १६५ विद्यार्थी सातवीत गेले त्यापैकी ५२ हजार २४९ (२.५८% ) विद्यार्थ्यांची गळती झाली.**
- **इयत्ता १ली ते ५वीत १ कोटी १ लाख २५ हजार ७१६ विद्यार्थी शिक्षण घेत होते त्यापैकी ५५ हजार ६९१ (०.५५%)गळती झाली.**
- **इयत्ता ६वी ते ८वी इयत्तेत ६० लाख ४६ हजार ७१८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी ३६ हजार ८८४ (०.६१%) विद्यार्थ्यांची गळती झाली.**


*-स्त्रोत: www.udise.in (2014-15)*

# शालेय शिक्षण विभाग

सामाजिक आणि आर्थिक विकासाची प्रगती सुकर करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व सर्वमान्य आहे. शिक्षणामुळे वैयक्तिक आणि सामूहिक नावलौकिक मिळविण्याच्या संधी उपलब्ध होतात. लोकांना कौशल्य व ज्ञान मिळवून देऊन त्यांना उत्पादक रोजगारीची संधी मिळवून देणे आणि पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी तसेच युवकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत निर्णायक साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीचे केवळ लेखन व वाचन संस्था विकसित करणे एवढेच अपेक्षित नसून व्यक्तीमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करून, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत (Physical Infrastructure) सामाजिक पायाभूत सुविधा (Social Infrastructure) निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक पायाभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो. तशीच गती शिक्षणाचा समावेश असणाऱ्या सामाजिक पायाभूत सुविधांवर करणे क्रमपात्र ठरते.

## मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाच्या एकूण अर्थसंकल्पात सरासरी खर्च केवळ २५ हजार ८७२ कोटी रुपये

*आलेख क्र. १.* *(रु. कोटीत )*




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | १३१५५ | १७३३० | २४१०८ | २७७८८ | २९६३६ | ३३९५३ | ३५४६२ | ४०१४६ | ४२६२१ |
| सुधारित अंदाज | १४६७८ | २११५४ | २४६४६ | २६७२८ | ३०४५३ | ३३०९६ | ३६४२९ | ४००६२ | |
| प्रत्यक्ष खर्च | १४८२३ | २००६२ | २३६९१ | २६०७२ | २९०९२ | ३२५९३ | ३४७७५ | | |


*(स्त्रोत :वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*
*टीप: वर्ष २०१५-१६ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००८-०९ ते वर्ष २०१४-१५ या मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च हा रु. २५ हजार ८७२ कोटी इतका झाला.
- मागील ७ वर्षांत सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले गेले मात्र विभागाला त्याप्रमाणात निधी उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही.
- त्यामुळे वर्ष २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाज व वर्ष २०१५-१६ मधील सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले जाऊनही विभागाला मात्र त्यामानाने कमीच निधीची उपलब्धता होईल हे सांगणे सहज शक्य आहे.

# मागील ७ वर्षात राज्य अर्थसंकल्पाच्या योजनांतर्गत खर्चाच्या तुलनेत सर्वसाधारण शिक्षणावरील सरासरी योजनांतर्गत खर्च केवळ ३.४४ टक्के

## २०१५-१६च्या तुलनेत २०१६-१७मध्ये १ हजार ८५६ कोटींची घट

*आलेख क्र. २*




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनांतर्गत खर्च | २.५२ | २.५२ | ३.५५ | ४.२६ | ३.६४ | ३.१३ | ४.४३ | ५.९७ | ३.२५ |
| योजनेतर खर्च | १९.८६ | २३.५८ | २४.९६ | २३.८७ | २२.०७ | २४.२९ | २०.९३ | २२.१४ | २२.१३ |

*(स्रोत : वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*

*(टीप: वर्ष २०१५-१६चे सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- राज्य योजनेतील १०० रुपयांपैकी केवळ ३.४४ रुपये हे सर्वसाधारण शिक्षणावर खर्च होतात. विकसनशील देशातील राज्यांमध्ये शिक्षणावर अधिक खर्च होणे क्रमप्राप्त असते. तो खर्च जेव्हा कमी होतो याचा अर्थ आपण शिक्षणाला प्राधान्य दिलेले नाही.

- **वर्ष २०१५-१६ च्या सुधारलेल्या अंदाजानुसार सर्वसाधारण शिक्षणासाठी रु. ४ हजार २७९ कोटींचा निधी दिला आहे. मात्र वर्ष २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात हा निधी रु. २ हजार ४२३ कोटी एवढा कमी झाला आहे. वर्ष २०१५-१६च्या तुलनेत त्यात रु. १ हजार ८५६ कोटींनी घट झाली आहे.**

- दहा वर्षांपूर्वी राज्य योजनेतील १०० रुपयांपैकी ५ रुपये सर्वसाधारण शिक्षणावर खर्च होत होते. परंतु मागील ७ वर्षांत त्यात सातत्याने घट होताना आढळते **वर्ष २००८-०९ व २००९-१० मध्ये केवळ २.५२ टक्के** इतके सर्वाधिक कमी निधी उपलब्ध झाला. यातून शासनाची शिक्षणाप्रती असणारी उदासीनता स्पष्ट होते.


- वर्ष २०१६-१७ मध्ये शासनाने ३.२५ टक्के इतका योजनांतर्गत निधी तर २२.१३ टक्के योजनेतर खर्च अर्थसंकल्पीत केला आहे.

# गेल्या ७ वर्षात प्राथमिक शिक्षणावर झालेला खर्च ५१ टक्के

## शासनाचे आश्वासन मात्र ७५ टक्क्यांचे

लोकशाही आघाडी शासनाने सन २००० मध्ये जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमात राज्य स्थूल उत्पन्नाच्या किमान ७ टक्के रक्कम शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल व त्यापैकी ७५ टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी प्राथम्याने राखून ठेवण्यात येईल असे म्हटले होते. मात्र आघाडी शासनाने आपली उक्ती सार्थ केली नाही त्यांच्या पायावर पाऊल ठेवीत २०१४ मध्ये आलेल्या युती शासनानेही प्राथमिक शिक्षणासाठी ७५ टक्के निधी उपलब्ध केलेला नाही.

*आलेख क्र. ३*




*(स्रोत: खर्चाचा प्रधानशीर्ष नि विभागवार सारांश व लोकलेखा, अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*

*(टीप: वर्ष २०१५-१६चे सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- २०१५-१६ मध्ये शिक्षणावरील एकूण खर्चापैकी सर्वाधिक ५३.८० टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणासाठी सुधारित अंदाज करण्यात आले आहेत. वर्ष २०१६-१७ मध्ये ५२.७४ टक्के निधी अंदाजित केला आहे. म्हणजे तो २०१५-१६ पेक्षा कमी आहे. मात्र जेव्हा वर्ष २०१५-१६ मध्ये निधी प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध केला जाईल तेव्हा त्यात घट झालेली असेल.


- वर्ष २००८-०९ ते २०१४-१५ या ७ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा सरासरी खर्च केवळ ५१.५१ टक्के राहिला आहे.

- **गेल्या ७ वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी सर्वात जास्त निधी वर्ष २०११-१२ मध्ये ५३.१० टक्के उपलब्ध झाला होता. तर २०१५-१६ मध्ये ५३.८० टक्के निधी सुधारित अंदाजित केला आहे.**

- **वर्ष २०१६-१७ मध्ये नव्याने आलेल्या शासनानेही प्राथमिक शिक्षणाप्रती आस्था दाखविलेली नाही. प्राथमिक शिक्षणासाठी ७५ टक्के निधी राखून ठेवणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात ५२.७४ टक्के निधी राखून ठेवला आहे. प्रत्यक्षात खर्च कमी होणार हे गृहित धरले पाहिजे.**

# राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च १८ टक्के

*आलेख क्र.४*




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १५.४२ | १७.८८ | १९.५२ | १८.९४ | १७.५० | १९.२१ | १७.२७ | १७.४६ | १६.९४ |

*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
*(टीप: वर्ष २०१५-१६ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७चे अर्थसंकल्पीय अंदाज)*


- राज्य अर्थसंकल्पापैकी सर्वसाधारण शिक्षणावर मागील ७ वर्षांत सरासरी १७.९६ टक्के निधी उपलब्ध.
- सर्वसाधारण शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा आलेख पाहता असे दिसते की, वर्ष २००८-०९ मध्ये ते सर्वात कमी १५.४२ टक्के इतके होते. तर वर्ष २०१०-११मध्ये ते सर्वात जास्त १९.५२ टक्के इतके होते.
- वर्ष २००९-१० ते २०१४-१५ या ६ वर्षांच्या कालावधीत २०१४-१५ मध्ये सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च सर्वात कमी झाला असून तो १७.२७ टक्के आहे.
- **मागील ७ वर्षात सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च हा राज्य अर्थसंकल्पाशी तुलना करता कधीच २० टक्क्यांपेक्षा जास्त झालेला नाही.**

***अर्थसंकल्पात सांगितल्याप्रमाणे शालेय शिक्षणावर ३० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात येत असला तरी गुणात्मक फरक दिसून येत नाही. वर्ष २०१५-१६ मध्ये 'शिक्षण हक्क कायद्याच्या' अंमलबजावणीसाठी १ हजार ६९० कोटी ५६ लाख एवढा निधी राखून ठेवल्याचे म्हटले असले तरी तेवढा खर्च होईलच असे नाही. तसेच विभागाने सर्वसाधारण शिक्षणावर राज्याच्या एकूण महसुली खर्चाच्या १/६ निधी खर्च करणे गरेचे आहे.***

*-स्रोत: अर्थसंकल्प, २०१५-१६ आणि कार्यक्रम अंदाजपत्रक, २०१५-१६ शालेय शिक्षण (प्राथमिक शिक्षण)*

# सर्वसाधारण शिक्षण व तंत्रशिक्षणावरील खर्च
# राज्य स्थूल उत्पन्नाच्या केवळ २.४० टक्के

*आलेख क्र.५*




*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
*(टीप: शिक्षणावरील एकूण खर्चात २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण यांचा समावेश आहे)*
*(टीप: वर्ष २०१५-१६चे सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- शिक्षणावरील खर्च हा २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण या प्रधान शीर्षांच्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण वर्ष २००८-०९ ते २०१४-१५ पर्यंत सरासरी २.४१ टक्के इतके होते.

- **वर्ष २०१६-१७ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावरील खर्चाचे प्रमाण केवळ २.१७ टक्के इतकेच अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे. म्हणजे सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर होणारा खर्च २००८-०९ पेक्षाही कमी अर्थसंकल्पीत झाला आहे. आतापर्यंतचा हा सर्वात नीचांक असून त्यापेक्षाही कमी निधी उपलब्ध होईल.**

- वर्ष २०१३-१४ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षण यावर खर्चाचे प्रमाण २.४९ टक्के एवढे होते, वर्ष २०१४-१५ मध्ये ते २.१९ टक्क्यांवर आले.

- **वर्ष २०१२-१३ मध्ये सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत २.५२ टक्के खर्च करण्यात आले होते. हे प्रमाण गेल्या ८वर्षात सर्वात अधिक राहिले आहे.**

# केळकर समितीने अभ्यासलेली राज्यातील शिक्षणाची स्थिती व सुचविलेल्या शिफारशी

☞ **शिक्षणाच्या हक्कामध्ये व राज्य सरकारच्या भौतिक पायाभूत सोयी सुविधांसाठी विहित केलेली मानके व प्रमाणके साध्य केली पाहिजेत, टिकवून ठेवली पाहिजेत आणि या संदर्भात काहीही खपवून घेता कामा नये.**

☞ **तसेच यासाठी पुरेशी वित्तीय तरतूद केली पाहिजे शिक्षणासाठी रक्कम कमी पडू देता कामा नये.**

☞ शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अध्यापनशास्त्रात शिक्षकांचे पुनर्प्रशिक्षण करण्याची गरज आहे.

☞ **राज्यात विविध भागांतील लौकिक असलेल्या संस्थांना, मागासलेल्या क्षेत्रांमध्ये व अधिक विशेष म्हणजे आदिवासी क्षेत्रामध्ये त्यांची शैक्षणिक प्रांगणे (कॅंपस) उभारण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.**

☞ **शिक्षणामध्ये माध्यमस्तर व तांत्रिक स्तरावरील शिक्षणाचा समावेश केला गेला पाहिजे.**

☞ प्राथमिक शिक्षणाच्या इयत्ता ४थी नंतरच्या व इयत्ता ५वी नंतरच्या स्तरांवर सरकारी परीक्षा सुरू करण्यात याव्यात. ही परीक्षा गंभीरपणे घेण्यात यावी आणि प्राथमिक स्तरावर देण्यात येत असलेल्या शिक्षणाच्या दर्जाचे मोजमाप म्हणून या परीक्षांच्या निकालांचा वापर करण्यात यावा.

☞ मराठवाड्यामध्ये मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे आणि म्हणून महिलांसाठी वसतिगृहे व अन्य पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अतिरिक्त वित्तीय तरतूद करण्यात यावी.

☞ **राज्याच्या काही भागात असलेला निरक्षरतेचा उच्च स्तर, हा अजूनही ''शाळाबाह्य'' मुलांना परिणामकारकपणे शिक्षणव्यवस्थेत सामावून घेण्यात न आल्यामुळे आहे त्यात सुधारणा करण्याबाबत शासनाने अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.**

☞ **जरी साक्षरता दर ८२ टक्के असला तरी निरक्षरांची एकूण संख्या देखील खूपच जास्त आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात हे अपेक्षित नाही. साधन संपत्तीचा सुयोग्य वापर आणि विद्यमान धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी या माध्यमातून ही परिस्थिती सुधारण्याची आवश्यकता आहे.**

☞ महिलांमधील निरक्षरता ही अधिक असून, त्यावर लक्ष केंद्रीत करण्याची आणि खास करून नंदूरबारसारख्या भागामध्ये कडक मोहीम राबवून याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.

☞ २०११ च्या जनगणनेत प्रत्येक जिल्ह्याच्या तालुक्यांमधील साक्षरता दराची माहिती दिली आहे. यावरून लक्षात येणारी बाब म्हणजे साक्षरता दर निर्देशांकानुसार जिल्हा जरी प्रगत असला तरी त्यात अनेक तालुके अप्रगत दिसून येतात. **उदा. ठाणे जिल्ह्याचा साक्षरता दर २०११ च्या जनगणनेनुसार ८६.२ टक्के आहे. तर तलासरी तालुक्यात ५८.९%, विक्रमगड ५७.८%, जव्हार ५८.६%, आणि मोखाडा तालुक्यात ५८.४% इतका साक्षरता दर नोंदविण्यात आला आहे. या जिल्ह्यांमधील महिला साक्षरता दर त्याहीपेक्षा कमी म्हणजे ४६ ते ५१ टक्के इतका आहे. हे मुख्य आदिवासी जिल्हे आहेत. आणि या जिल्ह्यांकरिता विशेष उपायोजना करणे आवश्यक आहे.**

☞ **ठाणे जिल्ह्यात रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त असल्याने स्थलांतरित मुलांचे प्रमाणही या जिल्ह्यात सर्वात अधिक आहे.**

# शासनाला ७४ हजार ९७१ शाळाबाह्य मुले अखेर सापडली

## राज्यात आढळून आलेली जिल्हानिहाय शाळाबाह्य मुले/मुली

कालावधी ४ जुलै २०१५ ते ३१ जानेवारी, २०१६

तक्ता क्र.२

| शाळाबाह्य मुलं | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अक्र.** | **जिल्हा** | **मुले** | **मुली** | **एकूण** | **अक्र.** | **जिल्हा** | **मुले** | **मुली** | **एकूण** | **अक्र.** | **जिल्हा** | **मुले** | **मुली** | **एकूण** |
| १ | अहमदनगर | ७१३ | ६४३ | १३५६ | १३ | जळगांव | १३७२ | १२५५ | २६२७ | २५ | **पालघर** | **२२६५** | **२७८३** | **५०४८** |
| २ | अकोला | ३३९ | ३०४ | ६४३ | १४ | जालना | १३२३ | ८९७ | २२२० | २६ | **पुणे** | **३०८४** | **२७५२** | **५८३६** |
| ३ | अमरावती | ४६१ | ३५३ | ८१४ | १५ | कोल्हापूर | ४१७ | १८२ | ५९९ | २७ | रायगड | ६३२ | ६८३ | १३१५ |
| ४ | औरंगाबाद | ११८४ | ६९८ | १८८२ | १६ | लातूर | ४४९ | २४७ | ६९६ | २८ | रत्नागिरी | २६४ | २१० | ४७४ |
| ५ | बीड | १३५७ | १०४९ | २४०६ | १७ | मुंबई | १०६९ | ६४६ | १७१५ | २९ | सांगली | ७०६ | २६३ | ९६९ |
| ६ | भंडारा | १८४ | ११६ | ३०० | १८ | **मुंबई उप.** | **६२६७** | **५३७८** | **११६४५** | ३० | सातारा | २६८ | २६४ | ५३२ |
| ७ | बुलडाणा | ३९७ | ३२२ | ७१९ | १९ | नागपूर | ९८४ | ७५३ | १७३७ | ३१ | सिंधुदुर्ग | २५६ | ११० | ३६६ |
| ८ | चंद्रपूर | ३७६ | २३४ | ६१० | २० | नांदेड | १०१२ | ८०० | १८१२ | ३२ | सोलापूर | ११९८ | ७५१ | १९४९ |
| ९ | धुळे | २०४९ | १४९३ | ३५४२ | २१ | नंदुरबार | १७५४ | २११२ | ३८६६ | ३३ | ठाणे | **४४३७** | **३७५६** | **८१९३** |
| १० | गडचिरोली | ४१६ | ४५३ | ८६९ | २२ | **नाशिक** | **३१९०** | **२३४६** | **५५३६** | ३४ | वर्धा | १०५ | ९० | १९५ |
| ११ | गोंदिया | २०६ | १५३ | ३५९ | २३ | उस्मानाबाद | २७२ | २६१ | ५३३ | ३५ | वाशिम | १५९ | ८६ | २४५ |
| १२ | हिंगोली | ८८७ | ८८९ | १७७६ | २४ | परभणी | ६७७ | ४५७ | ११३४ | ३६ | यवतमाळ | २५१ | २०२ | ४५३ |
| | | | | | | | | | | | **एकूण** | ४०९८० | ३३९९१ | ७४९७१ |

*-स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त माहिती*

☞ ४ जुलै, २०१५ ते ३१ जानेवारी, २०१६ च्या दरम्यान ७४ हजार ९७१ शाळाबाह्य मुले आढळून आली असून त्यापैकी ३३ हजार ९९१(४५.३३%) मुलींचा समावेश आहे.

☞ मुंबई उपनगरात सर्वात जास्त शाळाबाह्य मुले आढळून आली असून त्यांची संख्या ११ हजार ६४५ (१५.५३%) आहे. त्यानंतर ठणे जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर असून शाळाबाह्य मुलांची संख्या ८ हजार १९३ (१०.९२%) आहे. तिसऱ्या क्रमांकावर पुणे जिल्हा असून शाळाबाह्य मुलांची संख्या ५ हजार ८३६ (७.७८%) आहे, चौथ्या क्रमांकावर नाशिक जिल्हा असून शाळाबाह्य मुलांची संख्या ५ हजार ५३६ (७.३८%) आहे तर पाचवा क्रमांक पालघर जिल्ह्याचा असून पालघर जिल्ह्यात ५ हजार ४८ (६.७३%) शाळाबाह्य मुले आढळून आली आहेत.

☞ मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक व पालघर या ५ जिल्ह्यांमध्ये ३६ हजार २९८ शाळाबाह्य मुले आढळून आली असून एकूण आढळलेल्या शाळाबाह्य मुलांच्या तुलनेत ही संख्या ४८.३६% आहे.

☞ शाळाबाह्य मुलींची संख्या पाहता मुंबई उपनगर मध्ये सर्वात जास्त ५ हजार ३७८, दुसऱ्या क्रमांकावर ठाणे जिल्हा असून ३ हजार ७५६, पालघर मध्ये २ हजार ७८३ मुली आढळल्या असून एकूण आकडेवारीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर चौथ्या क्रमांकावर पुणे जिल्हा असून पुणे जिल्ह्यातील शाळाबाह्य मुलींची संख्या २ हजार ७५२ आहे. तर पाचव्या क्रमांकावर नाशिक जिल्हा असून नाशिक जिल्ह्यात २ हजार ३४६ तर नंदूरबार जिल्हा ७व्या क्रमांकावर असून २ हजार ११२ शाळाबाह्य मुली आढळून आल्या आहेत.

# केंद्र शासनाने दिलेली राज्यातील शाळाबाह्य मुलांची संख्या

वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६

तक्ता क्र. ३

| वर्ष | वय वर्षे | मुलं | मुली | एकूण | मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | ६ ते १४ | ४२५१८ | ४८१२८ | ९०६४६ | ५३.०९ |
| २०१३-१४ | | ४९९२० | ३७०३६ | ८६८५६ | ४२.६४ |
| २०१४-१५ | | ३४५२६ | २८८९४ | ६३४२० | ४५.५६ |
| २०१५-१६ | | ४८७२३ | ३७४८८ | ८६२११ | ४३.४८ |

*-स्त्रोत: मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार*

☞ वर्ष २०१२-१३ मध्ये वय वर्षे ६ ते १४ दरम्यान सर्वात जास्त म्हणजे ९० हजार ६४६ शाळाबाह्य मुले आढळून आलीत त्यापैकी ४८ हजार १२८(५३.०९%) मुली होत्या.

☞ वर्ष २०१३-१४ मध्ये ८६ हजार ८५६ शाळाबाह्य मुले आढळून आलीत त्यापैकी ३७ हजार ३६ (४२.६४%) मुली होत्या.

☞ वर्ष २०१४-१५ मध्ये ६३ हजार ४२० शाळाबाह्य मुले आढळून आली होती. मागील २ वर्षात आढळून आलेल्या मुलांपेक्षा ही संख्या २३ हजार ते २७ हजारांपेक्षा कमी होती. वर्ष २०१५-१६ मध्ये ८६ हजार २११ शाळाबाह्य मुले आढळून आली ही संख्या मागील वर्षाच्या तुलनेत २२ हजार ७९१ ने अधिक आहे.

**महाराष्ट्र शिक्षण परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक ४ जुलै २०१५ ते ३१ जानेवारी २०१६ या कालावधीमध्ये ७४,९७१ मुले शाळाबाह्य आहेत. त्याचप्रमाणे केंद्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार ८६,२११ इतकी मुले शाळाबाह्य असल्याचे सांगितले आहे. तर डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार राज्यात ९२,५७६ मुलांची गळती झाली. म्हणजे ही सुद्धा मुले शाळाबाह्य आहेत. या तीनही ठिकाणची बेरीज केली तर ही संख्या २,५३,७५८ वर जाते. यावरून आपल्याला यातील दाहकता समजू शकते.**

# राज्यात शिक्षकांची ४९ हजार ९६२ पदे रिक्त
# तर ३ हजार ९७ एकशिक्षकी शाळा - फेब्रुवारी २०१६ पर्यंत

तक्ता क्र.४

| अ.क्र. | जिल्हा | एकूण शाळा | एक शिक्षकी शाळा | शिक्षकांची मंजूर पदं | प्रत्यक्ष भरलेली पदं | रिक्त पदं |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ५२६३ | ७८ | ३२३६५ | ३००२९ | २३३६ |
| २ | अकोला | १८०२ | ३५ | १३३३५ | १२४५७ | ८७८ |
| ३ | अमरावती | २८५२ | ३८ | १९९८८ | १८४६२ | १५२६ |
| ४ | औरंगाबाद | ४०४१ | ६१ | २९७५५ | २८०४० | १७१५ |
| ५ | बीड | ३६६९ | २८ | २३४२० | २१९८३ | १४३७ |
| ६ | भंडारा | १३२८ | १३ | ९०६१ | ८००० | १०६१ |
| ७ | बुलढाणा | २४०२ | ४८ | १८२८७ | १६२३३ | २०५४ |
| ८ | चंद्रपूर | २५२३ | ४९ | १६५६८ | १५७५८ | ८१० |
| ९ | धुळे | १९६० | ३८ | १४२८५ | १३२९२ | ९९३ |
| १० | गडचिरोली | २०७५ | ६४ | १०१२६ | ९२६८ | ८५८ |
| ११ | गोंदिया | १६८४ | १७ | १०७४१ | ९८८० | ८६१ |
| १२ | हिंगोली | १२९१ | २३ | ८४०८ | ७८१९ | ५८९ |
| १३ | जळगाव | ३२७२ | ८४ | २६३१२ | २४२५० | २०६२ |
| १४ | जालना | २३०६ | ५३ | १३९७५ | १२८०६ | ११६९ |
| १५ | कोल्हापूर | ३६३७ | ३९ | २५८६८ | २४६३५ | १२३३ |
| १६ | लातूर | २६१० | ७१ | २०७०० | १९५८४ | १११६ |
| १७ | मुंबई उपनगर | १६५८ | १ | ३८७५७ | ३६५८६ | २१७१ |
| १८ | मुंबई | २४७२ | ५३ | २३७४५ | २३१३७ | ६०८ |
| १९ | नागपूर | ४०३५ | ६२ | ३३२१४ | ३१३८३ | १८३१ |
| २० | नांदेड | ३६४२ | ११९ | २४४८८ | २३२०५ | १२८३ |
| २१ | नंदूरबार | २०४० | ४२ | ११९७५ | १०६३८ | १३३७ |
| २२ | नाशिक | ५४६८ | ३०६ | ३८३४८ | ३५३३८ | ३०१० |
| २३ | उस्मानाबाद | १८१२ | ३० | १२०६१ | ११२४० | ८२१ |
| २४ | परभणी | २०७४ | ४४ | १४४९१ | १३०३३ | १४५८ |
| २५ | पालघर | ३२२२ | ३२५ | १८३१० | १८३४२ | -३२ |
| २६ | पुणे | ७१५८ | १९३ | ६०४१५ | ५७९६५ | २४५० |
| २७ | रायगड | ३८४२ | ३४९ | २०१९७ | १९००० | ११९७ |
| २८ | रत्नागिरी | ३३३६ | १७१ | १४२६६ | १३३०१ | ९६५ |
| २९ | सांगली | २९०६ | ११४ | १९१२७ | १७०९१ | २०३६ |
| ३० | सातारा | ३८३९ | ३९ | २१९२४ | २०४०२ | १५२२ |
| ३१ | सिंधुदुर्ग | १७७१ | ५६ | ७६९३ | ७०७१ | ६२२ |
| ३२ | सोलापूर | ४७२० | ९० | ३१२४८ | २९६९७ | १५५१ |
| ३३ | ठाणे | ४६८० | २४१ | ४१६८६ | ४०२६२ | १४२४ |
| ३४ | वर्धा | १५०८ | ३७ | ९५८० | ८४६१ | १११९ |
| ३५ | वाशिम | १३४३ | १६ | ९०६९ | ८०९३ | ९७६ |
| ३६ | यवतमाळ | ३३४४ | ७० | २०५३९ | १७६२४ | २९१५ |
| | **एकूण** | **१०७५८५** | **३०९७** | **७६४३२७** | **७१४३६५** | **४९९६२** |

☞ महाराष्ट्र शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा १ लाख ७ हजार ५८५ शाळा राज्यात आहेत.

☞ १ लाख ७ हजार ५८५ शाळांमधून ७ लाख ६४ हजार ३२७ शिक्षकांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी ७ लाख १४ हजार ३६५ पदे भरली गेली असून ४९ हजार ९६२ पदे रिक्त आहेत.

☞ राज्यात एकूण ३ हजार ९७ एकशिक्षकी शाळा असून सर्वात अधिक रायगड जिल्ह्यात ३४९ पालघर मध्ये ३२५ व नाशिक जिल्ह्यात ३०६ पदे रिक्त आहेत

☞ २ हजार पेक्षा जास्त शिक्षकांच्या जागा रिक्त असलेले जिल्हे पुढील प्रमाणे यवतमाळ सर्वात अधिक २ हजार ९१५, दुसऱ्या क्रमांकावर अहमदनगर २ हजार ३३६, तिसऱ्या क्रमांकावर मुंबई उपनगर २ हजार १७१, चौथ्या क्रमांकावर जळगाव २ हजार ६२, पाचव्या क्रमांकावर बुलढाणा २ हजार ५४ तर सहाव्या क्रमांकावर सांगली जिल्हा असून या जिल्ह्यात शिक्षकांच्या २ हजार ३६ जागा रिक्त आहे.

## केंद्र शासनाच्या माहितीप्रमाणे राज्यात ३२ हजार ९४४ पदे रिक्त
## वर्ष २०१५-१६

तक्ता क्र.५

| शाळा | मंजूर | | | भरलेली | | | रिक्त | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य | स.शि.अ. | एकूण | राज्य | स.शि.अ. | एकूण | राज्य | स.शि.अ. | एकूण |
| प्राथमिक | २०१२५३ | २७५७० | २२८८२३ | २०१२५३ | १४९४० | २१६१९३ | ० | १२६३० | १२६३० |
| मुख्याध्यापक | ७९५२ | ११८७८ | १९८३० | ७९५२ | ० | ७९५२ | ० | ११८७८ | ११८७८ |
| उच्च प्राथमिक | ७४२०४ | १३०९ | ७५५१३ | ६७९६४ | ४४७ | ६३४११ | ६२४० | ८६२ | ७१०२ |
| मुख्याध्यापक | ३२८७ | १३३४ | ४६२१ | ३२८७ | ० | ३२८७ | ० | १३३४ | १३३४ |
| **एकूण** | **२८६६९६** | **४२०९१** | **३२८७८७** | **२८०४५६** | **१५३८७** | **२९०८४३** | **६२४०** | **२६७०४** | **३२९४४** |

*-स्त्रोत: मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार*

☞ वर्ष २०१५-१६ पर्यंत राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक मंजूर शिक्षक व मुख्याध्यापकांची संख्या ३ लाख २८ हजार ७८६ होती. त्यापैकी २ लाख ९० हजार ८४३ पदे भरण्यात आली व ३२ हजार ९४६ शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत.

☞ प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे पाहिली तर आजही अनुक्रमे १९ हजार ७३२ शिक्षक व १३ हजार २१२ मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत.

☞ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या पदे पाहिली तर असे लक्षात येते की, एकूण रिक्त पदांपैकी २४ हजार ५०८ पदे ही प्राथमिक शाळेतील आहेत एकूण रिक्त पदांमध्ये हे प्रमाण ७४.३९% आहे.

☞ मुख्याध्यापकांची एकूण १३ हजार ३१२ पदे रिक्त असून त्यापैकी प्राथमिक शाळांमधील ११ हजार ८७८ (८९.२२%) पदे रिक्त आहेत.

## सर्व शिक्षा अभियान राबविणारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद-मुंबई कार्यालयातच ५८ पदे रिक्त

### सर्व शिक्षा अभियान अंतर्गत भरण्यात आलेली पदे

तक्ता क्र.६

| अ.क्र. | पद | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य प्रकल्प संचालक | १ | १ | ० |
| २ | सह संचालक-प्रशासन | १ | ० | १ |
| ३ | सहसंचालक-(Pfroj,Med,Dist,Ed, TrgmAdmn,Reseach, F&A) | १ | ० | १ |
| ४ | सह संचालक-वित्त लेखा | १ | १ | ० |
| ५ | प्रकल्प उपसंचालक | १ | ० | १ |
| ६ | उपसंचालक -विश्लेषण | १ | १ | ० |
| ७ | कार्यकारी अभियंता | १ | १ | ० |
| ८ | उप अभियंता | ६ | ३ | ३ |
| ९ | सहाय्यक अभियंता | ७ | २ | ५ |
| १० | समन्वयक (IED Gender, EGS) | ३ | ३ | ० |
| ११ | लेखा अधिकारी | २ | १ | १ |
| १२ | संगणककार्यक्रम अधिकारी | ५ | २ | ३ |
| १३ | खरेदी अधिकारी | १ | ० | १ |
| १४ | कार्यक्रम अधिकारी | ८ | २ | ६ |
| १५ | सहाय्यककार्यक्रम अधिकारी | १४ | १४ | ० |
| १६ | कनिष्ठ अभियंता (H.O.) | १५ | ३ | १२ |
| १७ | नकाशा संरचनाकार | १ | ० | १ |
| १८ | वास्तु विशारद | १ | ० | १ |
| १९ | प्रारुपकार | २ | ० | २ |
| २० | सहाय्यक लेखा अधिकारी | ४ | ४ | ० |
| २१ | कनिष्ठ लेखा अधिकारी | ३ | ३ | ० |
| २२ | स्टेनोग्राफर-मराठी, इंग्रजी | ४ | ४ | ० |
| २३ | स्टेनो-टाईपीस्ट | २ | ० | २ |
| २४ | डाटा एंट्री ऑपरेटर | २४ | १० | १४ |
| २५ | क्लर्क कम टाइपिस्ट | ९ | ८ | १ |
| २६ | ड्राईव्हर | ५ | ३ | २ |
| २७ | नाईक | १ | १ | ० |
| २८ | शिपाई | ७ | ६ | १ |
| २९ | पहारेकरी | २ | २ | ० |
| | **एकूण** | **१३३** | **७५** | **५८** |

*-स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

☞ केंद्र शासन वर्ष २००१-२ पासून 'सर्व शिक्षा अभियान' सर्व राज्यात राबवित आहे. महाराष्ट्र राज्यात सर्व शिक्षा अभियानाची जबाबदारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबईकडे असून केंद्र शासन व राज्य शासनाची समन्वय साधणे व राज्यातील सर्व जिल्ह्यात व सर्व महानगरपालिकांमध्ये निधीचे वितरण करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम महाराष्ट्र शिक्षण परिषद करीत आहे.

☞ माहितीच्या अधिकार अंतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबईकडे त्यांच्याकडील आस्थापने विषयी माहिती मागविली असता धक्कादायक माहिती समोर आली असून त्यांच्या मुंबई कार्यालयात १३३ पदं मंजूर असून त्यापैकी केवळ ७५ पदे भरली गेली आहेत तर ५३ (५६.३९%)पदे रिक्त आहेत.

☞ ५३ रिक्त पदांमध्ये सहसंचालकाचे २ पदे, प्रकल्प उपसंचालकाचं एक पद, उप अभियंता ३ पदे, सहाय्यक अभियंता ५ पदे, कार्यक्रम अधिकारी ६ पदे, कनिष्ठ अभियंता १२पदे, त्याचप्रमाणे नकाशा संरचनाकार वास्तु विशारद, व प्रारुपकार अशी महत्त्वाची पदे रिक्त आहे.

## रिक्त पदांचा वाढला भार; प्रभारींचाच सर्वत्र कारभार

वसई तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २१३ शाळा आहेत. त्यापैकी १९ शाळा मुख्याध्यापकांच्या प्रतिक्षेत असून वसई तालुक्यात मागील सहा वर्षात स्वतंत्र गट शिक्षण अधिकारी देण्यात आला नसून आतापर्यंत विस्तार अधिकाऱ्यांवर प्रभारी म्हणून गटशिक्षण अधिकाऱ्यांची जबाबदारी टाकून शिक्षणाचा गाडा रेटायचे काम चालले आहे. तसेच मागील सहा महिन्यांपासून पंचायत समितीचे गटविकास अधिकाऱ्याचे पदही रिक्त आहे. तो भार सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यावर प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून भार टाकण्यात आला आहे.

मुख्याध्यापकांची एकूण १३ हजार ३१२ पदं रिक्त असून त्यापैकी प्राथमिक शाळांमधील ११ हजार ८७८ (८९.२२%) पदे रिक्त आहेत. वसई तालुक्यातील १९ शाळांमध्ये मुख्याध्यापकांची नियुक्ती करीत नसल्यामुळे मुख्याध्यापकांशी संबंधित पाठसभा, मिटींग आणि इतर कामे शाळेतील वरिष्ठ शिक्षक पार पाडत आहेत. १२५ शिक्षकांची कमतरता असताना शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. शाळेचे शैक्षणिक धोरण ठरविण्यात मुख्याध्यापक हे पद महत्त्वाचे असताना सरकार मात्र भरती प्रक्रिया करण्यासाठी वेळकाढू धोरण अवलंबत आहे. सदर१९ शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा खालावत असल्याने मुलांची पटसंख्या कमालीची कमी झाली आहे. राज्यभर शिक्षक आणि शिक्षकतेर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांची तीच स्थिती असल्यामुळे त्याचा एकूणच राज्याच्या शिक्षणावर अनिष्ट परिणाम झाला आहे.

## एक शिक्षकी शाळांचे ग्रहण सुटेना!

शिक्षण हक्क कायद्यानुसार एक शिक्षकी शाळा कालबाह्य ठरविल्या आहेत. ६० विद्यार्थ्यांपर्यंत २ शिक्षक असणे अनिवार्य केले आहे. १ एप्रिल २०१३ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. परंतु राज्यात आजही ३ हजार शाळा एक शिक्षकी असताना याचे समर्थन शिक्षण मंत्री कसे करणार? नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा आजही एकशिक्षकी आहेत. डहाणू तालुक्यातील ४७१ शाळांपैकी १३ शाळा एकशिक्षकी आहेत. या सर्व शाळा आदिवासी भागातील असून बहुसंख्य विद्यार्थी आदिवासी आहेत.त्यामुळे एका शिक्षकाला किमान ४ किंवा त्यापेक्षा अधिक वर्ग सांभाळावे लागतात. शैक्षणिक वातावरणा अभावी शैक्षणिक असमतोल, विद्यार्थी गळती. अध्ययन अध्यापन प्रक्रियेला खीळ बसत आहे.

आज संपूर्ण महाराष्ट्रात ९७ हजार ८४ प्राथमिक शाळांपैकी, ३ हजार ९ शाळा या एक शिक्षकी आहेत. असे 'डायस' चा २०१४-१५ चा अहवाल सांगतो. पालघर जिल्ह्यापेक्षा महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांची स्थिती आज वेगळी नाही. संयुक्त राष्ट्र संघाच्या जाहीरनाम्यानुसार बालकांच्या दहा हक्कांपैकी सातवा हक्क शिक्षणाचा आहे. भारतीय संविधानाने कलम २१ (क) प्रमाणे सहा ते १४ वर्षांच्या बालकांना मोफत तसेच सक्तीच्या शिक्षणाचा हक्क बहाल केला आहे. मात्र वरील स्थिती पाहता शिक्षणाचा दर्जा सुधारत असल्याचा राज्य शासनाचा दावा फोल ठरला आहे. याबाबत हे शासन कोणती उपाययोजना करणार आहे.

## राज्यातील २२ हजार शिक्षकांची उपासमार

राज्यातील २२ हजार शिक्षकांना वर्ष २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात योजनांतर्गत खर्च मंजूर झाला असून १ तारखेला वेतन देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊनही मागील ३ महिन्यांपासून वेतनच मिळालेले नाही. राज्यात सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी राज्य शासनाची असताना त्या बालकांना शिकवण्याची जबाबदारी ज्या शिक्षकांवर आहे आज राज्यातील २२ हजार शिक्षकांना वर्ष २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात वेतनाचा खर्च मंजूर झालेला असूनही ३ महिन्याचे वेतन न मिळणे हे त्यांचे सामाजिक आणि आर्थिक खच्चीकरण करण्याचा प्रकार आहे. तरी या संबंधात कोण कोण अधिकारी दोषी आहेत तसेच या दोषी अधिकाऱ्यांवर शिक्षण मंत्री कोणती कारवाई करणार आहेत याची माहिती सदनाला देण्यात यावी.

**शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण पुरे झाले आता कृती करा, आणि प्रत्यक्ष योजना कार्यान्वयीत करा.**

# सर्व शिक्षा अभियानांचा २३० कोटींचा निधी अखर्चित

## सर्व शिक्षा अभियान-कस्तुरबा गांधी बाल विद्यालय

तक्ता क्र.७ *रु. लाखात*

| अ.क्र | जिल्हा | उपलब्ध निधी | खर्च, जाने. २०१६ पर्यन्त | उपलब्ध निधी व खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | चंद्रपूर | १५१८.६३ | १५०४.५६ | ९९.०७ |
| २ | अहमदनगर | ४५३६.१७ | ४४७४.९० | ९८.६४ |
| ३ | सांगली | १६९१.२७ | १६६१.९१ | ९८.२६ |
| ४ | बीड | ३१९८.८२ | ३१३३.२५ | ९७.९५ |
| ५ | यवतमाळ | ३१३१.०३ | ३०३१.०८ | ९६.८० |
| ६ | कोल्हापूर | १८९२.३१ | १८२६.४६ | ९६.५२ |
| ७ | रायगड | २८१६.४२ | २७०४.६६ | ९६.०३ |
| ८ | बुलढाणा | २०३८.४८ | १९४१.७७ | ९५.२५ |
| ९ | वर्धा | १०१०.२२ | ९५६.८९ | ९४.७२ |
| १० | पुणे | ३०२७.४४ | २८३९.७९ | ९३.८० |
| ११ | गोंदिया | १९७६.९२ | १८५२.१० | ९३.६८ |
| १२ | नागपूर | १६९५.२८ | १५७९.३४ | ९३.१६ |
| १३ | भंडारा | १२०५.६५ | १११४.४७ | ९२.४३ |
| १४ | जालना | २८०३.३७ | २५७९.६२ | ९२.०१ |
| १५ | ठाणे | ३४२०.८५ | ३१४०.६९ | ९१.८१ |
| १६ | गडचिरोली | २२३६.०१ | २०४४.३३ | ९१.४२ |
| १७ | लातूर | १७२८.२४ | १५७३.१८ | ९१.०२ |
| १८ | नांदेड | ४१२७.७८ | ३६९८.५१ | ८९.६० |
| १९ | औरंगाबाद | ३९००.५६ | ३४७३.४९ | ८९.०५ |
| २० | अमरावती | १८४०.७७ | १६२२.२१ | ८८.१२ |
| २१ | सातारा | २४७७.८४ | २१७४.७९ | ८७.७६ |
| २२ | रत्नागिरी | १५८२.२९ | १३८२.७८ | ८७.३९ |
| २३ | जळगांव | २३०४.८४ | १९५४.८३ | ८४.८१ |
| २४ | धुळे | १७७८.१८ | १४८०.७९ | ८३.२७ |
| २५ | वाशिम | १०२८.५३ | ८२२.९० | ८०.०० |
| २६ | नाशिक | ५८२६.५१ | ४६२४.७० | ७९.३७ |
| २७ | सिंधुदुर्ग | ९७५.५४ | ७६७.०४ | ७८.६२ |
| २८ | सोलापूर | ३६८२.९७ | २८२२.५५ | ७६.६३ |
| २९ | उस्मानाबाद | १३९३.४८ | १०६५.७३ | ७६.४७ |
| ३० | नंदुरबार | २४७२.४० | १८६२.५० | ७५.३३ |
| ३१ | परभणी | २४७९.८५ | १७८१.६८ | ७१.८४ |
| ३२ | पालघर | १७६०.२७ | १२५०.६३ | ७१.०४ |
| ३३ | हिंगोली | १४०५.४९ | ८९२.७९ | ६३.५२ |
| ३४ | अकोला | १०९९.८३ | ५३४.४० | ४८.५८ |
| ३५ | राज्य कार्यालय | १४०६०.७५ | ९४०.५८ | ६.६८ |
| | एकूण | ९४१२५.०० | ७१११११.९० | ७५.५४ |

*-स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

- वर्ष २०१५-१६ मध्ये ३४ जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या सर्व शिक्षा अभियानासाठी जानेवारी, २०१५ पर्यंत रु. ९४१ कोटी २५ लाख इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला होता त्यापैकी रु. ७११ कोटी ११ लाख (७५.५४%) निधी खर्च करण्यात आला आहे.
- सर्व शिक्षा अभियान राबविणारी तसेच केंद्र व राज्याशी समन्वय साधणारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या राज्य कार्यालयासाठी रु.१४० कोटी ६० लाख ७५ हजार एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यापैकी केवळ रु. ९ कोटी ४० लाख ५८ हजार (६.६८%) खर्च झाला आहे.

☞ अकोला, हिंगोली, पालघर व परभणी या ४ जिल्ह्यांमध्ये ७५ टक्केही खर्च करण्यात आलेला नाही.

☞ अकोला जिल्ह्यात उपलब्ध जालेल्या निधीच्या रु. ५६५ कोटी ४३ लाख (५१.४२%)निधी खर्च होणे बाकी होता. तर हिंगोली जिल्ह्यात रु. ५१२ कोटी ७ लाख (३६.४८%) निधी खर्च होणे बाकी होता.

☞ पालघर जिल्ह्यात रु. ५०९ कोटी ६४ (२८.९६%) लाखाचा निधी खर्च होणे बाकी आहे. तर परभणी जिल्ह्याचा रु. ६९८ कोटी १७ लाख (२८.१६%) निधी खर्च झालेला नाही. हीच स्थिती थोड्या फार फरकाने इतर जिल्ह्यांची आहे.

# २३ नगरपालिकांकडे २२ कोटी २४ लाखाचा निधी अखर्चित

## सर्व शिक्षा अभियान - नगरपालिकांचा खर्च जानेवारी २०१६ पर्यंत

तक्ता क्र.८ *रु.लाखात*

| अ.क्र. | नगरपालिका | नगरपालिका उपलब्ध निधी | खर्च जाने.२०१६ पर्यन्त | उपलब्ध निधीशी खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अहमदनगर नगरपालिका | ७८.१३ | ७८.०४ | ९९.८८ |
| २ | भिवंडी नगरपालिका | १६१.०३ | १५४.१४ | ९५.७२ |
| ३ | मुंबई (उप.संचालक) | ३४४.३५ | २७८.२२ | ८०.७९ |
| ४ | मुंबई सह(बृहन्मुंबई महानगरपालिका) | ७४३.६४ | ५८६.६२ | ७८.८८ |
| ५ | कल्याण-डोंबिवली मनपा | ११३.०३ | ८६.३२ | ७६.३६ |
| ६ | नागपूर मनपा | ३८५.८१ | २८०.८६ | ७२.७९ |
| ७ | ठाणे मनपा. | १५९.६५ | १११.४० | ६९.७७ |
| ८ | कोल्हापूर मनपा | १३७.०३ | ९२.७५ | ६७.६८ |
| ९ | अकोला मनपा | ८३.१४ | ५०.३७ | ६०.५८ |
| १० | पुणे मनपा | २५७.३२ | १५४.४८ | ६०.०३ |
| ११ | मिरा-भाईंदर मनपा | ५८.१९ | ३४.८६ | ५९.९० |
| १२ | अमरावती मनपा | ९४.२३ | ५१.२६ | ५४.३९ |
| १३ | मालेगांव मनपा | १७१.७७ | ९०.४१ | ५२.६३ |
| १४ | नांदेड-वाघला मनपा | १४०.७२ | ७३.३० | ५२.०८ |
| १५ | धुळे मनपा | ९६.६६ | ४८.५२ | ५०.१९ |
| १६ | औरंगाबाद मनपा | २११.७२ | ९६.८३ | ४५.७३ |
| १७ | पिंपरी-चिंचवड | १०६.०३ | ४४.३१ | ४१.७९ |
| १८ | सांगली-मिरज कुपवड | १६३.७८ | ६६.५१ | ४०.६० |
| १९ | जळगांव मनपा | १३८.३६ | ५५.६८ | ४०.२४ |
| २० | नाशिक मनपा. | ५०९.१५ | २०४.५९ | ४०.१८ |
| २१ | सोलापूर मनपा | ६७६.४४ | २६७.७६ | ३९.५८ |
| २२ | उल्हासनगर मनपा. | ७७.४४ | २२.५४ | २९.१० |
| २३ | नवी मुंबई मनपा. | २९३.१३ | ४६.०७ | १५.७१ |
|  | **एकूण** | **५२००.७८** | **२९७५.८४** | **५७.२१** |

*-स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती*

- ☞ राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत खर्च होण्याचे प्रमाण जिल्हा परिषदांपेक्षाही कमी आहे.
- ☞ वर्ष २०१५-१६ या कालावधीत जानेवारी २०१६ पर्यंत सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील २३ नगरपालिकांना रु. ५२ कोटी ७८ लाख एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता त्यापैकी रु. २९ कोटी ७५ लाख ८४ हजार (५७.२१%) निधी खर्च झाला आहे म्हणजे आजही रु. २२ कोटी २४ लाख ९४ हजारांचा (४२.७९%) निधी अखर्चित आहे.
- ☞ सर्वात कमी निधी खर्च केलेल्या नगरपालिका नवी मुंबई रु. २ कोटी ९३ लाख १३ हजारांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता त्यापैकी रु. ४६ लाख ७ हजार (१५.७१%) खर्च करण्यात आले. तर उल्हासनगर मनपाला रु. ७७ लाख ४४ हजारांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता त्यापैकी रु. २२ लाख ४४ हजार (२९.१०%) खर्च करण्यात आले.
- ☞ सर्वात अधिक निधी खर्च करणाऱ्या नगरपालिकांमध्ये अहमदनगर नगरपालिका व भिवंडी नगरपालिकांचा समावेश असून अहमदनगर नगरपालिकेने रु. ७८ लाख १३ हजार निधी उपलब्ध झाला होता त्यापैकी रु. ७८ लाख ४ हजार (९९.८८%) व भिवंडी नगरपालिकेला रु. १ कोटी ६१ लाख ३ हजारांचा निधी उपलब्ध करून दिला होता त्यापैकी रु. १ कोटी ५४ लाख १४ हजार (९५.७२%) निधी उपलब्ध झाला आहे.

## नियमबाह्य खरेदीमुळे केंद्राने निधी रोखला!
## शिक्षण विभागाची कोट्यवधीची खरेदी नियमबाह्य!

नवीन शासन सत्तेवर आल्यानंतर विविध योजनांसाठी असलेला निधी ३१ मार्च पूर्वी खर्च न झाल्यास परत जाईल, या भीतीने शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, महात्मा गांधी आदी राष्ट्रपुरुषांची छायाचित्रे राज्यातील १८ हजार शाळांमध्ये लावण्यासाठी 'भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघा'कडून खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच गुजरात मधील 'डाटा प्रोसेसिंग फार्म्स प्रा. लि.' कडून ही नियमबाह्य खरेदी करण्याचा धडाका लावण्यात आला आहे. हा निर्णय महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने कुणाच्या सांगण्यावरून घेतला याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीत सुसूत्रता आणण्यात यावी.